Trust Reg. No. F-3967, Bombay
Chief Patron : Hon. Sharadrao Pawar Saheb
Minister for Agriculutre, GoI, New Delhi

# Maharashtra Judo Association

Affiliated to Judo Federation of India & Maharashtra Olympic Association

**Datta Aphale**
General Secretary

Black Belt IV Dan
IJF Continental Referee (JUA-A)
Indian Judo Team Coach.

'Kedar', Plot No. 19, Sector - C,
N - 4, CIDCO, Aurangabad-431 003
Cell - 94231 50231

29.09.2018, पुणे

माननीय अध्यक्ष / सचिव,
संलग्न आणि निमंत्रित जिल्हा ज्युदो संघटना

**विषय: 46 व्या कॅडेट व ज्युनियर्स (मुले व मुली) खुली राज्य ज्युदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चांचणी स्पर्धा, सांगली-2018**

महोदय / महोदया,

कळविण्यास आनंद होतो की महाराष्ट्र ज्युदो संघटना आणि सांगली जिल्हा युथ ज्युदो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 46 व्या कॅडेट आणि ज्युनियर्स (मुले आणि मुली) खुली राज्य ज्युदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चांचणी स्पर्धा-2018 सांगली येथे आयोजित करण्यात आलेल्या आहेत. स्पर्धेतील विजेत्या संघास 'सन्माननीय नामदार श्री शरदचंद्र पवार फिरता चषक' दिला जाईल. हा चषक कॅडेट आणि ज्युनियर्स गटासाठी सातारा येथील 40 व्या राज्य स्पर्धेपासून दिला जातोय.

स्पर्धेचा तपशील खालील प्रमाणे;

- **स्पर्धेचा कालावधी**: दिनांक 12-13 आणि 14 ऑक्टोबर 2018 (शुक्रवार, शनिवार, आणि रविवार)
- **स्पर्धेचे ठिकाण**: जिल्हा क्रीडा संकुल, बॅडमिंटन हॉल, सांगली
- **स्पर्धेचे वेळापत्रक**: 1) दिनांक 12.10.2018; अ) **खेळाडुंचे आगमन**: दुपारी 12 वाजेपर्यंत.
  ब) **रजिस्ट्रेशन**: सकाळी 7 ते 12 पर्यंत;
  क) **वजने**: सकाळी 8 ते 3 वाजेपर्यंत;
  ड) **व्यवस्थापक आणि पंचांची मीटिंग** दुपारी 3 वाजता;
  इ) **स्पर्धा**: दि.12-10.18- संध्या. 5 वाजेपासून ते वेळापत्रक संपेपर्यंत;
  2) दिनांक दि.13 आणि 14 ऑक्टोबर 2018; स्पर्धा - सकाळी 8.00 ते वेळापत्रक संपेपर्यंत.

**आजपर्यंतच्या अनुभवाप्रमाणे काही जिल्हे नेहमीच उशिरा येतात अथवा एकाच जिल्ह्यातील काही खेळाडू वेळेवर आणि काही उशिरा येतात त्यामुळे त्या जिल्ह्याच्या कागदपत्रांच्या तपासणीचे आणि वजनाच्या कामास अतिरिक्त वेळ लागतो पर्यायाने संपूर्ण व्यवस्थेवर त्याचा विपरीत भार पडतो. सर्व सचिवांना विनंती आहे की वेळेचे महत्व लक्षात घेता आपल्या संघाच्या प्रवासाचे नियोजन तसे आखून वेळेवर संघाला स्पर्धास्थानी वेळेवर उपस्थित रहाण्याच्या सूचना द्याव्यात.**

- **निवास व्यवस्था**: **मुली**- क्रीडा संकुल वसतिगृह, सांगली; **मुले-** क्रीडा संकुल वसतिगृह नजीकची इमारत
- **एंट्री फॉर्म**: एंट्री / प्रवेश फॉर्म जन्मदाखला व फोटोसह भरावा. प्रवेश फॉर्म्स दिनांक **08 ऑक्टोबर 2018** पर्यन्त श्री. दत्ता आफळे, सचिव, राज्य ज्युदो संघटना (aphaledm@gmail.com) **तसेच** श्री. शैलेश टिळक, सचिव, तांत्रिक समिती (stilak@yahoo.com) यांच्याकडे सॉफ्टकॉपी पाठवावी. उशिरा एंट्री पाठवल्यास अथवा पाठवलेल्या एंट्रीमध्येनंतर बदल केल्यास रुपये 1000/- दंड आकारला जाईल. फॉर्म इंग्रजीमध्येच टाईप करून भरावा जेणेकरून प्रमाणपत्रे योग्य लिहिली जातील. प्रवेशिकेमध्ये लिहिल्याप्रमाणे संबंधित खेळाडूला खेळावे लागेल. सर्व माहिती पुर्णपणे आणि **मुले व मुलींची वेगवेगळ्या कागदांवर भरलेली** प्रवेशिका अध्यक्ष / सचिव यांच्या स्वाक्षरी आणि शिक्क्यांनीशी असायला हवी. सदरील फॉर्म संघासोबत येणाऱ्या अधिकृत व्यवस्थापक / प्रशिक्षकाबरोबर पाठवावा.

- **प्रवेश शुल्क**: रुपये 300/- प्रत्येकी. सबज्युनियर्स, कॅडेट आणि ज्युनियर्स तसेच सिनियर्सचे निमंत्रित संघ वार्षिक शुल्क रुपये 3000/- ज्यांनी बीड येथे भरले नसतील त्यांना या स्पर्धेवेळी भरावे लागतील याची नोंद घ्यावी.
- **भोजन शुल्क**: रुपये 500/- यामध्ये दि.12-13 आणि 14 ऑक्टोबर 2018 रोजी एकूण 2 न्याहारी, 5 भोजन सामील आहे.
- **निवास व्यवस्था**: दिनांक 12.10.2018 च्या दुपारी 12.30 पासून ते 15.10.2018 संध्याकाळपर्यंत केलेली आहे.
- **अनामत रक्कम**: प्रत्येक संघास रु 1000/- अनामत रक्कम जमा करावे लागतील.
- **रिपोर्टिंग**: सर्व संघांनी स्पर्धास्थळी दिनांक 12.10.2018 रोजी दुपारी 12.00 पर्यन्त पोहोचणे आवश्यक आहे. **पंचांनी दि. 12.10.2018 रोजी सकाळी 10 वाजेपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे**.
- **स्पर्धा नियम**: स्पर्धा जेएफआयच्या नूतन प्रचलित नियमांप्रमाणे आयोजिल्या जातील.
- प्रत्येक जिल्ह्याच्या संघामधील मुले-मुली गटाच्या एका वजनगटामद्धे एकाच खेळाडूस सहभागी होता येईल.
- **वजनगट:**

| कॅडेट - जन्मसाल **2003** ते **2001** | | ज्युनियर्स - जन्मसाल **2003** ते **1998** | |
|---|---|---|---|
| मुले वयोगट<br>**(15 वर्षांवर ते 18 वर्षाखाली )** | मुली वयोगट<br>**(15 वर्षांवर ते 18 वर्षाखाली)** | पुरुष वयोगट<br>**(15 वर्षांवर ते 21 वर्षाखाली)** | महिला वयोगट<br>**(15 वर्षांवर ते 21 वर्षाखाली)** |
| | | 45 किलोवर ते **50** किलोपर्यंत | 36 किलोवर ते 40 किलोपर्यंत |
| **40** किलोवर ते 45 किलोपर्यंत | **32** किलोवर ते 36 किलोपर्यंत | 50 किलोवर ते 55 किलोपर्यंत | 40 किलोवर ते 44 किलोपर्यंत |
| **45** किलोवर ते 50 किलोपर्यंत | **36** किलोवर ते 40 किलोपर्यंत | 55 किलोवर ते 60 किलोपर्यंत | 44 किलोवर ते 48 किलोपर्यंत |
| **50** किलोवर ते 55 किलोपर्यंत | 40 किलोवर ते 44 किलोपर्यंत | 60 किलोवर ते 66 किलोपर्यंत | 48 किलोवर ते 52 किलोपर्यंत |
| **55** किलोवर ते 60 किलोपर्यंत | 44 किलोवर ते 48 किलोपर्यंत | 66 किलोवर ते 73 किलोपर्यंत | 52 किलोवर ते 57 किलोपर्यंत |
| 60 किलोवर ते 66 किलोपर्यंत | 48 किलोवर ते 52 किलोपर्यंत | 73 किलोवर ते 81 किलोपर्यंत | 57 किलोवर ते 63 किलोपर्यंत |
| 66 किलोवर ते 73 किलोपर्यंत | 52 किलोवर ते 57 किलोपर्यंत | 81 किलोवर ते 90 किलोपर्यंत | 63 किलोवर ते 70 किलोपर्यंत |
| 73 किलोवर ते 81 किलोपर्यंत | 57 किलोवर ते 63 किलोपर्यंत | 90 किलोवर ते 100 किलोपर्यंत | 70 किलोवर ते 78 किलोपर्यंत |
| 81 किलोवर ते 90 किलोपर्यंत | 63 किलोवर ते 70 किलोपर्यंत | 100 किलोवर | 78 किलोवर |
| 90 किलोवर | 70 किलोवर | | |

- सदरील स्पर्धा आपण राष्ट्रीय स्पर्धांच्या परिपत्रकापूर्वी आयोजित करत आहोत. हे वजनगट गतवर्षीप्रमाणे आहेत आणि यात बहुधा बदल नाहीत. परंतु काही कारणवश भारतीय ज्युदो महासंघांनी यात बदल केल्यास त्वरित तशी सूचना दिली जाईल म्हणजे आपणास त्याप्रमाणे आपल्या जिल्ह्याचा संघ निवडून आणता येईल. कृपया याची नोंद घ्यावी.
- 15-16 आणि 17 वर्षांच्या खेळाडूंना केवळ एकाच श्रेणीमध्ये म्हणजे एकतर कॅडेट अथवा ज्युनिअरमधे खेळता येईल. एक खेळाडू कॅडेट आणि ज्युनिअर अशा दोन्हीही श्रेणींमधे खेळू शकणार नाही.
- कॅडेट मुले (45 किलोखाली) आणि कॅडेट मुली (36 किलोखाली) तसेच ज्युनियर्स मुले (50 किलोखाली) आणि ज्युनियर्स मुली (40 किलोखाली) यांचे विजेते राष्ट्रीय स्पर्धेला जाणार नाहीत. आपण फक्त राज्य स्पर्धेसाठी हे दोन वजन गट ठेवलेले आहेत.
- खेळाडू त्यांच्या संबंधित वजनगटामध्येच खेळू शकतील. जन्मतारखेच्या दाखल्यासंदर्भात जेएफआयच्या नियमाप्रमाणे खालील तीन मूळ अधिकृत प्रतिमधे वयाचा दाखला आणणे गरजेचे आहे. याशिवाय खेळाडूला खेळण्यास परवानगी मिळणार नाही.
- **अ)** महानगरपालिका / पंचायत समिती अथवा समरूप शासकीय अधिकृत व्यक्तिद्वारा जारी वयाचा दाखला / विभागातील सक्षम मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी लेटरहेडवर सहीशिक्यांनीशी जारी केलेला दाखला,
- **ब)** मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी लेटरहेडवर सहीशिक्यांनीशी जारी केलेले प्रमाणपत्र

यामधे जन्मतारीख, वडिलांचे नाव, विद्यार्थ्याचा शिकत असलेला वर्ग, पत्ता, टेलिफोन क्रमांक, आणि शाळेचा फॅक्स आणि दूरध्वनी क्रमांक लिहिलेला असायला हवा. ही माहिती विद्यार्थ्याच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोवर रबरी शिक्का आणि मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसह साक्षांकीत (अटेस्टेड) केलेले हवे.

- **क)** भारत सरकारतर्फे जारी केलेल्या आधार कार्डाची मूळ प्रत

हे तीनही दाखले अनिवार्य असून याशिवाय खेळाडूस खेळू दिले जाणार नाही.
(दाखल्याच्या प्रमाणासाठी जेएफआयचे स्पर्धेसंदर्भातील मूळ इंग्रजी परिपत्रक ग्राह्य धरले जाईल. खेळाडुंचे वय हे कॅलेंडर वर्षाप्रमाणे जानेवारी ते डिसेंबर असे गृहीत धरले जाईल.)
आपल्या संघातील दहावी / बारावीच्या विद्यार्थ्यांची नावे प्रवेशिकेशिवाय वेगळी देणे आवश्यक आहे. या परिपत्रकासोबतच्या नमूना फॉर्ममध्ये ती द्यावीत.

**वय सत्यापन चांचणी (Age verification Test -AVT)**

यावर्षीपासून फेडरेशनने वयाच्या सत्यापनाविषयी चाचणी करण्याची प्रक्रिया अनिवार्य केलेली आहे. या चाचणीशिवाय राष्ट्रीय स्पर्धेमध्ये खेळू दिले जाणार नाही. आपल्याकडे असलेला कालावधी लक्षात घेता आपण राज्य स्पर्धेसाठी ही चाचणी अनिवार्य करणार नाही मात्र राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवडल्या गेलेल्या खेळाडूंनी ही चाचणी करणे **अत्यावश्यक** आहे**.** त्यामुळे, राज्याच्या संघामध्ये जे खेळाडू निवडले जातील त्या खेळाडूंनी सांगली येथील स्पर्धा संपल्यावर लगेचच ही चाचणी त्यांच्या गावी करावी अन्यथा त्यांना राष्ट्रीय स्पर्धेमध्ये खेळू दिले जाणार नाही**.**

**कशी आहे ही चाचणी**?

वय सत्यापन चाचणी म्हणजे डिजिटल एक्सरे टी डब्ल्यु टेस्ट. ही चाचणी **कोणत्याही मान्यताप्राप्त हॉस्पिटलमधे** केली जावू शकते. शासकीय रुग्णालयात अद्ययावत सुविधा जर नसल्या तर **ही चाचणी खाजगी होस्पिटलमध्ये केली जावू शकते**. यासाठी खालील माहिती नीट वाचावी;




⇦ खेळाडूचे नाव, आधारकार्ड क्रमांक येथे द्यावा

⇦ जन्मतारीख

**AVT** लिंक **https://form.jotform.me/sportingethos/avp-jfi-march2018** यावर क्लिक करावे आणि आलेल्या फॉर्ममध्ये खालील माहिती काळजीपूर्वक भरावी;

- डाव्या हाताचा एक्सरे (पंजा आणि मनगट / फोरआर्मची खालील बाजू) 300 **dpi** सह डायकॉम फॉरमॅटमध्ये असलेल्या स्थितीतील एक्सरे काढावा.
- खेळाडूचे नाव, आधार कार्ड क्रमांक, जन्मतारीख याची एक्सरे मध्ये नोंद असायला हवी.
- एक्सरेची सॉफ्टकॉपी डायकॉम फॉरमॅटमधेच हवी जेणेकरून ही कॉपी ईमेलद्वारे पाठवता येईल.
- खेळाडूची ऊंची आणि वजन वरील लिंकद्वारे डाउनलोड केलेल्या फॉर्ममध्ये लिहावे/भरावे.
- जन्मतारखेचा दाखला आणि आधार कार्डाची प्रत / इतर दाखला फॉर्मसोबत जोडावा
- (वरील चाचणीची मूळ माहिती फेडरेशनच्या परिपत्रकामद्धे इंग्रजीमध्ये दिलेली आहे, ती पहावी)

- प्रत्येक जिल्हयातील खेळाडू हा त्या जिल्हयातील रहिवासी असायला हवा. अर्थात कोणताही खेळाडू स्वत:चा जिल्हा सोडून इतर जिल्हयातून खेळताना आढळल्यास त्यावर कारवाई होईल, तसेच त्यास मदत करणाऱ्या संबंधित क्लब / जिल्हयावरही कारवाई होईल.

स्पर्धा आणि निवास याठिकाणी कोणतेही गैरवर्तन / असभ्यपणा / मोठ्या आवाजात बोलणे - मोबाइल लावणे आदी सहन केले जाणार नाही. रहाण्याच्या जागेत कोणत्याही संघाने अथवा खेळाडूने गैरवर्तन केल्यास त्याची माहिती तत्काळ संयोजक अथवा सचिव, राज्य संघटना यांच्याकडे कळविण्याची जबाबदारी सामाईक राहील, तसेच मालमत्तेचे नुकसान कोणीही आणि कोणत्याही कारणाने केल्यास सर्व संघाचे डिपॉझिट जप्त केले जाईल आणि संबंधितांवर कडक कार्वाई केली जाईल. यामध्ये जिल्हयाचे निलंबनत्व देखील समाविष्ट आहे. सबब अशा कोणत्याही कृतीचे समर्थन करता येणार नाही आणि असे वर्तन खपवूनही घेतले जाणार नाही याची गंभीर नोंद सर्वांनी घ्यावी. महाराष्ट्र ज्युदो संघटना कोणत्याही परिस्थितीत, कोणाचेही गैरवर्तन कदापिही सहन करणार नाही. कृपया सर्व व्यवस्थापक प्रशिक्षक यांनी संघाबरोबर राहावे आणि गैरवर्तणूक होणार नाही याची काळजी घेऊन, आपल्या शिस्तप्रिय खेळाची परंपरा जबाबदारीने सर्वांनीच पुढे न्यावी ही सर्वांनाच आग्रहाची विनंती. यासाठी संघव्यवस्थापक आणि संघाबरोबरील प्रशिक्षकांना प्रत्येक जिल्हयाच्या सचिव/अध्यक्षांनी जागरूक रहाण्याच्या सूचना द्याव्यात. महाराष्ट्र ज्युदो संघटनेकडे प्राप्त झालेल्या तक्रारींची गंभीर दखल घेत राज्य संघटनेने नाशिक येथील 16 एप्रिल 17 रोजीच्या कार्यकारिणी सभेमध्ये निर्णय घेऊन अशा खेळाडूंवर निलंबनाची कारवाई केलेली आहे.

- व्यवस्थापक / प्रशिक्षक संघासोबत नसलेल्या संघास रहाण्याची जागा उपलब्ध होणार नाही.
- सभासद नसणाऱ्या जिल्हा संघटनेस स्पर्धेमधील सहभाग देण्याबाबतचा अधिकार महाराष्ट्र ज्युदो संघटनेकडे राखीव आहे.
- मॅटवर येवून वॉकओव्हर देणाऱ्या खेळाडूच्या संघास अशा वर्तनाच्या प्रत्येक खेळाडूस रु 500/- प्रमाणे दंड भरावा लागेल. सर्व पत्रव्यवहार संघटनेच्या लेटरहेडवर प्राधिकृत व्यवस्थापक अथवा सचिव यांच्या स्वाक्षरीने व्हावा.
- आयजेएफच्या /जेएफआयच्या नव्या नियमांनुसार खेळाडूस प्रोत्साहन देताना (चियरिंग करताना) अथवा कोणत्याही प्रसंगी रेफरीच्या निर्णयावर आक्षेपार्ह प्रतिक्रिया देणे, रेफरीचे लक्ष विचलित करणे आदी घडल्यास कारवाई करण्यात येवू शकते. यासाठी स्पर्धा दरम्यान प्रशिक्षकासाठी असलेल्या आसनव्यवस्था केली असते त्या खुर्चीवर जिल्हयाच्या प्रवेशिकेवर नाव असलेल्या प्रशिक्षकानेच बसायचे आहे. इतर कोणासही या ठिकाणी बसण्याची परवानगी नाही.
- रेफरींचा निर्णय अंतिम असेल. रेफरीच्या निर्णयाबाबत आक्षेप असल्यास फक्त संघाच्या व्यवस्थापकांनी या संदर्भात मॅट चेअरमन / स्पर्धा संचालक यांच्याशी संपर्क साधावा.
- आक्षेपार्ह सामन्याचे रेकॉर्डिंग पहाताना राज्य संघटनेच्या अधिकृत कॅमेरामधीलच रेकॉर्डिंग पाहिले जाईल, वैयक्तिक मोबाइलचे रेकॉर्डिंग गृहीत धरले जाणार नाही.

- राष्ट्रीय स्पर्धांसाठी जेएफआयच्या नियमाप्रमाणे असलेली ज्युदोगी ग्राह्य धरण्यात येतात यासाठी याची व्यवस्था राज्याच्या निवडल्या गेलेल्या संघातील खेळाडूंना करावी लागेल. मात्र राज्य स्पर्धेसाठी विशिष्ट कंपनीची ज्युदोगी हा निकष आवश्यक नसून फक्त फेडरेशनच्या नियमाप्रमाणे ज्युदोगीचा आकार आणि स्वच्छतेच्या बाबतीत निकष कायम असेल. महाराष्ट्र ज्युदो संघटनेचा आग्रह आहे की खेळाडूंनी IJF / JFI यांच्या मान्यताप्राप्त ज्युदोगी नेहमीच वापराव्यात.
- संघातील खेळाडूंच्या विम्याची जबाबदारी संबंधित जिल्ह्याची असेल. खेळाडूंना स्पर्धेच्या कालावधीमध्ये अथवा स्पर्धेकरिता येताना अथवा स्पर्धेहून आपल्या गावी परतताना कोणत्याही घटनेमुळे होणाऱ्या इजांची / दुर्घटनांची जबाबदारी संयोजक संघटना अथवा महाराष्ट्र ज्युदो संघटनेवर किंवा त्यांच्या पदाधिकाऱ्यांवर रहाणार नाही. मात्र स्पर्धेदरम्यान प्राथमिक उपचाराची सोय आयोजकांकडून स्पर्धा ठिकाणी करण्यात येईल. पुढील गंभीर उपचाराचा खर्च आणि सोय ज्या-त्या संघास करावी लागेल याची नोंद घ्यावी.
- राष्ट्रीय स्पर्धेसाठी सहभागी होण्याकरिता राज्याचा संघ या स्पर्धेतून निवडला जाईल. यासाठी सुवर्णपदक विजेता खेळाडू राज्याचे प्रातिनिधीत्व करेल. ज्या वजनगटामध्ये मुंबईचा खेळाडू प्रथम आला असेल तेथे लगेचच उर्वरित पदकविजेत्यांमधून स्पर्धा घेऊन / परिस्थितीनुरूप निर्णय घेऊन निवड केली जाईल. महाराष्ट्राच्या संघामध्ये निवड झालेल्या खेळाडूना राष्ट्रीय स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क, नोंदणी आणि भोजन खर्च आदीसाठी अंदाजे रु **800**/- लगेचच राज्य संघटनेकडे भरावे लागतील याची नोंद घ्यावी. हे शुल्क फेडरेशनच्या परिपत्रकामधे लिहिलेले असतात
- **राष्ट्रीय स्पर्धेसाठी लागणाऱ्या संघाच्या सवलतीच्या प्रवास खर्चाची जबाबदारी राज्य संघटना उचलेल. जर कन्फर्म तिकीटासाठी तात्काळ व्यवस्थेमधून पूर्ण रकमेचे बुकिंग करावी लागल्यास त्यासाठीचा लागणारा अतिरिक्त खर्च खेळाडूंना द्यावा लागेल, कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे जर कन्सेशन मिळाले नसल्यास पूर्ण तिकिटातील अर्ध्या तिकिटाचा खर्च खेळाडूला द्यावा लागेल.**
- महाराष्ट्र ज्युदो संघाकडील सर्व माहिती सर्व इच्छुकांना कायम उपलब्ध व्हावी-कोणीही स्पर्धेपासून / कार्यक्रमापासून वंचित राहू नये यासाठी इंटरनेटवर www.mahajudo.com हे संकेतकेन्द्र (वेबसाईट) उघडलेली आहे. कृपया सर्व ज्युदो संघटनांनी - खेळाडूंनी - ज्युदोप्रेमींनी या साईटवरून माहिती घ्यावी. अधिक माहितीसाठी दत्ता आफळे, (94231 50231 अथवा 90499 98765) शैलेश टिळक (94220-29656) किंवा श्री. चन्द्रशेखर साखरे, (94221-28009) यांच्याशी संपर्क साधावा.

कळावे,

Maharashtra Judo Association T.R.No. F-3967 Mumbai

आपला विश्वासू,

दत्ता आफळे

जनरल सेक्रेटरी,

महाराष्ट्र ज्युदो संघटना

> **गतवर्षीचे राष्ट्रीय स्पर्धेतील कॅडेट ज्युनियर्स पदकविजेते खेळाडूंचा सत्कार या स्पर्धेदरम्यान करण्यात येईल.**

| 46th Cadet and Juniors Judo Championship, Sangli-2018<br>LIST OF REFEREES | | | |
|---|---|---|---|
| 1 | Yatish Bangera | Tournament Director | |
| 2 | Yogesh Shinde | Mat Chairman | |
| 3 | Pramod Mendon | Mat Chairman | |
| 4 | Nitesh Shelke | Mat Chairman | |
| 5 | Sanjay Dhopaokar | Referee | Ahmednagar |
| 6 | Ajay Kulkarni | Table Official | Ahmednagar |
| 7 | Nursing Yadav | Referee | Amravati |
| 8 | Sachin Deole | Referee | Amravati |
| 9 | Ziauddin Ansari | Table Official | Aurangabad |
| 10 | Shailesh Kawale | Referee | Aurangabad |
| 11 | Kalyani Shetkar | Referee | Beed |
| 12 | Santosh Suravase | Table Official | Beed |
| 13 | Sharad Andure | Table Official | Beed |
| 14 | Anita Chavan | Table Official | Dhule |
| 15 | Prashant Wani | Referee | Dhule |
| 16 | Amol Desai | Referee | Kolhapur |
| 17 | Rajkumar Gupta | Referee | Mumbai |
| 18 | Suresh Samel | Referee | Mumbai |
| 19 | Nitesh Dhawale | Referee | Mumbai |
| 20 | Sachin Parab | Referee | Mumbai |
| 21 | Ritesh Bagat | Referee | Nagpur |
| 22 | Mohan Tong | Referee | Nagpur |
| 23 | Shreyash Potale | Referee | Nashik |
| 24 | Suhas Maind | Referee | Nashik |
| 25 | Dayanand Dhadve | Referee | PDJA |
| 26 | Smita Lonkar | Referee | PDJA |
| 27 | Atul Shelar | Referee | PJA |
| 28 | Madhushri Desai Kashid | Referee | Prabodhini |
| 29 | Atul Jadhav | Referee | Sangli |
| 30 | Sachin Mane | Referee | Sangli |
| 31 | Rushiraj Bhonsale | Referee | Satara |
| 32 | Shubham Shinde | Referee | Satara |
| 33 | Mangesh Bhosale | Referee | Thane |
| 34 | Poorva Mathew | Referee | Thane |
| 35 | Neha Naik | Table Official | Thane |